# प्रेस नोट २१/१०/२०२०

## भावाच्या खुनाचा बदला घेण्यासाठी केलेल्या खुनी हल्यातील ०४ आरोपी गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी-चिंचवड कडुन अवघ्या ५ तासात अटक

सदर प्रकरणाची हकिगत अशी की, दि. १९/१०/२०२० रोजी सायंकाळी चर्तुश्रृगी पोलीस ठाणे हद्दित औंध परिसरात दहशत असलेला व कुख्यात रावण टोळीशी संबंधित गुंड नामे क्षितिज लक्ष्मीकांत वैरागर, रा-औंध याचा सराईत गुन्हेगार नामे अनिकेत दिक्षित, रा- पोलीस लाईन औंध याने भरचौकात कुऱ्हाडीने वार करुन निघृन खुन केला होता. सदर बाबत चर्तुश्रृंगी पोलीस ठाणे, पुणे शहर गु.र.नंबर-१२९५/२०२० भा.दं.वि.कलम-३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येवुन आरोपीस अटक करण्यात आली होती.

यातील मयत इसम हा गुन्हेगारी पार्श्वभुमीचा व कुख्यात रावण टोळीशी संबंधित असल्याने सदर प्रकरणाचे पुणे शहर आयुक्तालय व पिंपरी चिंचवड आयुक्तालय परिसरात हिंसक पडसाद उमटण्याची शक्यता असल्याने **मा. सुधिर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड** यांनी संपुर्ण गुन्हेशाखेस सतर्क राहण्याचे आदेश दिले होते. त्या अनुशंगाने दि.२०/१०/२०२० रोजी **वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे, गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड** हे आपल्या पथकासह युनिट-४ चे हद्दित सतर्कपणे पेट्रोलिंग करत असताना बातमी मिळाली की, वर नमुद प्रकरणातील मयताचे खुनाचा बदला घेण्यासाठी मयताचे भावाने त्याचे इतर साथिदारासह आरोपीचा सख्खा भाऊ नामे प्रशांत दिक्षित याचे वर याचे वर पुणे शहर आयुक्तालयातील चर्तुश्रृगी पोलीस ठाणे हद्दित स्पायसर कॉलेज, औंध जवळ १८.०० वा दरम्यान धार-धार शस्त्राने खुनी हल्ला केला असुन ते पसार झाले आहेत त्याच वेळी पथकातील **पोहवा/प्रविण दळे** यांना त्याचे बातमीदाराकडुन बातमी मिळाली की यातील ०४ हल्लेखोर हे पिंपळे निलख नदीपात्रा जवळ लपुन बसले आहेत तेव्हा **सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख** आणि स्टाफने सदर ठिकाणी जावुन तेथे लपुन बसलेले ०४ हल्लेखोर इसम नामे

**१) आकाश लक्ष्मीकांत वैरागर, वय- २३ वर्षे रा- आंबेडकर कॉलनी जवळ, औंधगाव, पुणे**
**२) शुभम अनिल घाडगे, वय- २२ वर्षे, रा- भगत चाळ, औंधगाव, पुणे**
**३) शिवानंद बाळासाहेब पवार, वय- २३ वर्षे, रा- कस्तुरबा गांधी वसाहात, औंधगाव, पुणे**
**४) पुष्कर बाळासाहेब पवार, वय-२३ वर्षे, रा- माऊली अंगण बिल्डींग, औंधगाव, पुणे**

यांना बळाचा वापर करुन दि. २०/१०/२०२० रोजी रात्री १०:०० वाजता ताब्यात घेतले. सदर आरोपी कडे चौकशी करता आरोपी क्र १. हा मयत इसम नामे क्षितिज वैरागर याचा भाऊ असल्याचे व त्याने भावाच्या खुनाचा बदला घेण्यासाठी त्याचे इतर साथिदारासह सदरचा खुनी हल्ला केल्याचे निष्पन्न झाल्याने तसेच त्याबाबत चर्तुश्रृंगी पोलीस ठाणे गु.र.नंबर-१२९८/२०२० भा.दं.वि.कलम- ३०७,१४३,१४५, १४८, १४९ व आर्म ॲक्ट ४(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याने त्यांना पुढील तपास कामी चर्तुश्रृंगी पोलीस ठाणे, पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास चर्तुश्रृंगी पोलीस ठाणे करत आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त सो, मा. श्री. कृष्णा प्रकाश, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, स.पो.फौ. धर्मराज आवटे, पोहवा/ प्रविण दळे, संजय गवारे, नारायण जाधव, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ, पोना/ संतोष असवले, तुषार शेटे लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, पोशि/ शावरसिध्द पांढरे, सुनिल गुट्टे, प्रशांत सैद, तुषार काळे, सुरेश जायभाये, गोंविद चव्हाण, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, व नागेश माळी व राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे.

**( मोहन दा.शिंदे )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड